१९७६)  इवलेसे रोप लावियले द्वारी । तयाचा वेलू गेला गगनावरी ॥  (२००७



# ज्योती

*************************************************************************************

ईशान्य ओहायो मराठी मंडळ
neomm.org

ऑगस्ट–सप्टेंबर २००७
गणेश विशेषांक

NEOMM Tax ID: 34-1644989

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

---

## कार्यकारिणी २००७

अध्यक्षः  पराग काळे
president@neomm.org
सचिवः भास्कर मराठे
secretary@neomm.org
कोषाध्यक्षाः स्मिता सामंत
treasurer@neomm.org
सांस्कृतिक कार्यवाहः
चित्रा लेले, हेमांगी काळे
‘ ज्योती ’– संपादकः
कौस्तुभ लेले, अंजू जोशी
editor@neomm.org
‘ ज्योती ’मुद्रक–वितरकः अजित जोशी
वेब मास्टरः चैताली नाडकर्णी
वेब सहाय्यः आदेश दर्यापूरकर, समीर देशपांडे, प्रभा सातोसकर
विश्वस्त–रजनी दिवाण, रजनी शेंदुरे, कृष्णा देशपांडे

************************

## ज्योतीसाठी साहित्य

गावातील साहित्यिक मंडळींकडून *ज्योती* मध्ये साहित्याची आवश्यकता आहे. आपले लेख, कथा, कविता, ईनोद; दर सम महिन्याच्या (फेब्रु., एप्रिल, जून इत्यादि) १५ तारखे पर्यंत इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवावे. मराठी टायपिंगची सोय हस्तलिखित पानी $१० दराने उपलब्ध आहे.

**********************

## भारतमातेला ६०व्या  वाढदिवसाच्या शुभेच्छा !

## संपादकीय....

### स्वतंत्रते भगवति त्वामहं यशोयुतां वंन्दे ।

स्वातंत्र्यवीरानें लिहिलेली आरती मराठी मन भारावून टाकते.  भारत १९४७ साली स्वतंत्र झाला.  म्हणजे नागरिकाला राज्यकर्ते निवडण्याचा अधिकार मिळाला.  पण निवडणुकीला कोण उभा राहू शकेल हे ठरविण्याचा मात्र कधीच मिळाला नाही.  त्याचे परिणाम आपण गेली ६० वर्षे पाहिले.  आतां कुठे जरा सुबत्ता येत आहे, तर आतंकवादाचा नवाच राक्षस उभा ठाकला आहे.  अर्थात ज्या भारताने असे अनेक राक्षस पचवले त्याला हा कांहीं अवघड नाही.  पण त्याहूनही प्रबळ राक्षस आहे तो घातकी स्वार्थाचा.  एक विधायक स्वार्थ असतो, कीं जो उद्योगातून संपन्नता निर्माण करतो.  आणि एक घातक स्वार्थ कीं जो उद्योगात अडथळा बनतो, याचा पाडाव जेव्हां हाईल तेव्हां भारत खऱ्या अर्थानें स्वतंत्र होईल.

***

गवताच्या पातीची सळसळ ऐकू यावी अशी शांतता झाली.  मोकळया सभागृहात वाद्यवृंद सज्ज झाला होता.  त्यांचा प्रमुख म्हणजे कंडक्टर आला.  टाळ्या पडल्या.  त्यानें मान तुकवली.  पुनश्च शांतता. Cleveland Orchestra चा Concert चा कार्यक्रम बघायला–ऐकायला मित्रांबरोबर ॲक्रनला गेलो होतो.  सभागृहाच्या सभोवार उतारावरील हिरव्यागार गालिच्यावर ४–५ हजार श्रोते बसले होते. अनेक वाद्ये एकत्र वाजवून संगीत निर्माण करायला शिकवले या पाश्चात्यांनीं. त्यांतूनही मधूनच केवळ एकाच Lead Violin चा नाजूक आवाज १०० यार्ड दूर बसूनही स्पष्ट ऐकून आस्वाद घेण्याची शिस्तही त्यांचीच.  मला हेवा वाटला.  मनांत विचार येऊन गेला कीं आम्हां भारतीयांना अशा प्रसंगीं गप्पांचा मसाला मिसळूनच कलेचा आस्वाद घ्यायला आवडतो.  नुस्त्याच कलेची चवच लागत नाहीं, अळणी वाटते जणूं.  स्वार्थाची वेगळीच झलक वाटली.  घातक नसावी, पण उपद्रवी.

****

असो या वर्षी उन्हाळा लपंडाव खेळतो आहे.कधी आठवडाभर लपून बसतो मग अचानक येऊन कामावीना घाम गाळून घेतो.त तर कधी पावसाला धूमाकूळ घालायला पाठवतो. मला वाटत माणसाने निसर्गनियमा विरूद्ध खेळ खेळल्याने

## आगामी कार्यक्रम

**सप्टेंबर ८ २००७**
**दुपारी ३.३० वाजता**
***गणेश पूजा***
आणि ***गीतरामायण– आनंद माडगूळकर***
**स्थळ–SolonRecreation Centre**
**Solon OH 44139**

**सप्टेंबर २९ २००७**
***आयुष्यावर काही बोलू या***
**– Musical Performsnce by सलील कुलकर्णी**
**स्थळ– Chagrin Falls Intermedaite School Auditorium**

**ऑक्टोबर, २८ २००७–**
***कोजागीरी***
Songs from Golden Era-by Vijay Kelkar
क्लेग पार्क केबिन
१४०० क्लेग रोड
वेस्टलेक ओहायो ४४१४५
**प्रवेश–शुल्कः**
सभासद/आर.एस.वी.पी. –$१०,
अन्य सभासद–$१२,
विद्यार्थी – $१०,



## Advertisement Rates

per bimonthly issue

| | |
|---|---|
| Qrtr Page: | $25 |
| Half Page: | $50 |
| Full Page: | $75 |

. All rates for the Diwali issue are double.

*******************

निसर्ग जणू खवळून माणसाला वठणीवर आणायला निघाला आहे. निसर्गाचे नियम समजून घेऊन विज्ञानाद्वारां जीवन सुखावह करणें माणसाला साधलें आहे. पण त्या यशाचीच भुरळ पडून जणूं निसर्गावर सहजी मात करण्याची ताकत आल्याचा संभ्रम पडला आहे. निसर्गाला न जुमानतां, नव्हे तर डावलूनही, हम करे सो कायदा स्थापन करू बघतो आहे. पण निसर्ग पुहा पुन्हा माणसाला त्याच्या छोटेपणाची जाणीव करून द्यायचा प्रयत्न करतो आहे. पण माणसाचा सामुहिक हेकेखोरपणा हा त्याच्या स्वार्थाचाच आणखी एक पैलू. हा स्वार्थ प्राणिमात्रांच्या आणि निसर्गाच्या विरुद्ध वागतो.

***यो. मां पश्यति सर्वत्र सर्वंच मयि पश्यति ।*** हे शहाणपण माणसाला कधीं येणार ते देवच जाणे. या शहाणपणांतील सर्वोत्तम असे त्रिगुणातीत स्वातंत्र्य उपभोगणारा योगी विरळाच. आज भारतांत आहे ते तामसिक स्वातंत्र्य, कीं त्याचा अर्थच कळलेला नाहीं. वाटचाल व्हायला हवी आहे राजसिक स्वातंत्र्याकडे, कीं जिथे ऐहिक स्वार्थ प्रबळ आहे, पण कांहीं सामाजिक नीतिनियमांनुसार. त्यापुढील सात्त्विक स्वातंत्र्याची जाणीव फक्त कर्मयोगीच समाजाला देतात, देऊ शकतात.

**कौस्तुभ लेले**

************************************

## <u>अध्यक्षांचे मनोगत</u>

नमस्कार मंडळी !

बघता बघता उन्हाळा संपत आला ,मुलांची शाळा सुरु झाली सप्टेंबर महिन्यात मंडळाचे बरेच कार्यक्रम आहेत.सुरुवात ८ सप्टेम्बरच्या आनंद माडगूळकरांच्या गीत रामायणाने होत आहे त्यांच्या गदिमांच्या साहित्यावरील प्रभुत्व आम्ही मागील वर्षी अनुभवलेच आहे.

यावेळी ते गीत रामायणा वर कार्यक्रम सादर करतील.

२५ सप्टेम्बर ला पितृपंधरवडा चालू होत असल्याने ८ तारखेच्या कार्यक्रमाला जोडून अर्धा तास आधीगणेश पूजनाचा कार्यक्रम सर्वानुमते ठरवला आहे.

२९ सप्टेम्बरला ‘आयुष्यावर बोलू काही ‘ हा सलील कुलकर्णी यांचा कार्यक्रम आयोजीत केला आहे. कार्यक्रमानंतर सहभोजन ठेवले आहे त्याचा आस्वाद सर्वांनी घ्यावा ही अगत्याची विनंति.

आपल्या मंडळाच्या वेबसाइटची जबाबदारी चैताली नाडकर्णी यांनी स्वखुशीने स्वीकारली आहे.२९ च्य कार्यक्रमासाठी टेनेसी सारख्या ठीकाणांहून विद्यार्थी येणार आहेत. तेव्हा आपण देखील बहुसंख्येने उपस्थित राहाल व कार्यक्रम यशस्वी कराल अशी खात्री आहे

आपला

**पराग काळे**

****************************************

## मराठी अधिवेशन आणि क्लिव्हलंडची माहेरवाशिण एक मुलाखत

नुकतीच बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या तेराव्या अधिवेशनाची सियाटल येथे सांगता झाली. "हे विश्वचि घर माझे" समजून सर्व अमेरीकेभर पसरेली मराठी माणस ह्या अधिवेशनाला "सेतू बांधारे " म्हणत आपल्या भाषेच्या आणि संस्कृतीच्या ओढीनी जमा झाली होती. पैठण्या, काही चक्क नऊवारी साड्या, नाकावरच्या नथी, आणि एखादी पुणेरी पगडी असा मराठमोळा साज सियाटल कनव्हेनशन सेंटरनी चढवला होता. नाटक, नाट्यसंगीत, कविता, गप्पागोष्टी, चर्चा, लावण्या, नाच, नरेंद्र जाधवांच उत्कृष्ट भाषण आणि झाकीर हुसेनचा मंत्रमुग्ध करणारा तबला हे सर्वच एकाहुन एक सरस कार्यक्रम रसिकांची दाद मिळवून गेले. पण सियाटलहून परत येताना सगळ्यांचा बोलण्याचा विषय होता तिथे मिळालेल्या खास मराठी जेवणाचा. पुरणपोळी, श्रिखंड, नारळी भात, फ्रुटसॅलड, झुणका भाकर, पावभाजी, माशाचे कालवण, सोलाची आमटी, अळूचे फदफदे, ह्याच्याबरोबर उपासाला साबुदाणा खिचडी असा खास मराठी बेत होता. हे साग्रसंगीत मराठी जेवण सगळ्यांची वाहवा घेवून गेले. पण क्लिव्हलंडकरांना जरा जास्तच कौतुक आणि उत्सुकता होती त्या जेवणाबद्दल, कारण त्यातील एक केटरर होती आमच्या गावची माहेरवाशिण "शीला सोगल". तेव्हा तिच्यापर्यंत आमचे अभिप्राय पोह्चावेत आणि तिचे मनपूर्वक अभिनंदन करावे म्हणून फोन केला आणि दिलखुलास गप्पा झाल्या तिच्याशी.

**शीला, अग हे अचानक अधिवेशनाचे कस घडून आल?**

तुला माहितच आहे कि, मी क्लिव्हलंड सोडल्यापासून केटरिंगच्या व्यवसायापासून निवृतीच घेतली होती. पण क्लिव्हलंडलापूर्वी संजय आणि केतकी रानडे रहायचे, ते आता सियाटला आहेत, तर त्यांनी माझ नाव सुचवल तिथल्या कार्यकारी मंडळींना. मग अचानक २००६च्या उन्हाळ्यात आनंद पराजपेंचा फोन आला. अग मी तर बाहेर दुकानात खरेदी करत होते त्यांचा फोन आला तेव्हा. पण अतिशय उत्साह आला मला त्यांच्याशी बोलल्यावर. हे बघ मी १९९२ मध्ये माझ रेस्टॉरंट उघडल आणि १९९३ साली बाल्टीमोरला मराठी अधिवेशनाला गेले होते तेव्हापासून मनात होते की कधितरी मराठी अधिवेशनात लोकांना मराठी जेवण खावू घालायची संधी मिळावी. मग अशी अचानक ती संधी पुढ्यात आल्यावर ती कशी सोडणार?

**तुला त्यांनी कस निवडल?**

सियाटलचे आनंद परांजपे आणि विद्या आंगेळकर ह्यांच्याबरोबर बराच इ–मेलवर पत्रव्यवहार झाला. मग

ऑक्टोबरमध्ये मी आणि क्लिव्हलंडची दीपा देशपांडे सियाटला गेलो. तिथे २०-२५ जणांना आमच्या जेवणाचे प्रात्यक्षिक दिले. ते त्या सर्वांना खूपच आवडले. बर, तशी तोपर्यंत त्यांना माझ्याबद्दल माहिती झाली होती की माझी क्लिव्हलंडला दोन यशस्वी रेस्टॉरंटस होती वगैरे. त्यामुळे त्यांनी मला केटरींग कन्सलटंट म्हणून निवडल. सियाटलच्या संयोजकांनी अधिवेशनाच्या जेवणाची जबाबदारी ३-४ केटररस मध्ये वाटून द्यायचे ठरवले. न्युजर्सीतील सुमा फुडस, मदर इंडिया केटरींगचे घोळकर कुटुंब, श्रेयसचे चितळे आणि सॅफरॉन पॅच फ्लोरिडाची मी.

**तुम्ही मेनु कसा ठरवला? बरच पुढेमागे झाले असेल ना?**

हो, अग कारण पहिल्यांदा कनव्हेनशन हॉलचे लोक करणार होते सर्व पदार्थ आमच्या मार्गदर्शनाखाली. पण आपल्या गोष्टी करायला एवढ सोप का आहे? आपल्याकडे मराठी पदार्थ उत्तरदेशीय स्वयपाक्यालाही येण कठीण. त्यामुळे मागेपुढे होत शेवट आम्हीच सर्वकाही तिथे करायचे आणि कनव्हेनशन सेंटरचे लोक बाकीची मदत करणार अस ठरल. सियाटलच्या मंडळींचा पहिल्या पासुन आग्रह होता की, अस्सल मराठी जेवण द्यायच त्यामुळे श्रिखंड, पुरणपोळी, अळूचे फदफद, झुणका भाकर असा अगदी खास मराठी बेत ठरला. त्यात मला कारायच होत, फ्रुट सॅलड, मिश्र भजी, तुप भात, नारळी भात, पाव भाजी,गोव्याचे माशाचे कालवण आणि मेथी चिकन. श्रेयसचे चितळे आणि माझ्यावर आमटी आणि पंचामृत करायची जबाबदारी होती. आणि वटसावित्रीचा उपास होता त्यासाठी मी साबुदाणा खिचडी करणार होते.

**एकदा पदार्थ ठरल्यावर तुला काही खास तयारी करावी लागली का?**

पहिली गोष्ट म्हणजे मला आणि माझ्या सहकार्यांना वॉशिंगटन स्टेटच फुड लायसन्स घ्यायला लागल. मग लायाबिलीटी इनशुरन्स वगैरे. नंतर प्रत्येक पदार्थाची कृती पक्की करुन, २००० लोकांसाठी किती सामान लागेल त्याची यादी करुन त्याची स्प्रेड शीट करुन सियाटलला पाठवुन दिली सामुर्गीच्या खरेदी साठी.

**सियाटलच्या कार्यकारी मंडळाचा सहयोग कसा होता?**

अतिशय उत्तम. पहिल्या फोन पासुन अगदी शेवट पर्यंत त्यानी साथ दिली. नेहमीच्या इ-मेलस आणि फोन बरोबरच दर रविवारी अगदी न चुकता कॉनफरन्स कॉल असायचा. त्यांनी प्रत्येक पदार्थाची जबाबदारी त्यांच्या स्वयंसेवकात वाटून घेतली होती त्यामुळे काही अडचण आली तर कुणाकडे मदत मागायची ते आधिपासून ठरल होत.

**तुला असा ३-४ केटरर बरोबर एकत्र काम करायचा अनुभव नविनच असणार. "टू मेनी कुकस इन द किचन" अस झाल का? भाडी वाजली का? जरा आतल्या बातम्या सांग.**

तसा हा अनुभव नविनच होता. सुरवातिला आपण आपला पदार्थ कसा करतो ते सांगायला नको वाटायच. पण एव्हढया मोठ्या संख्येने सकाळ संध्याकाळ जेवण करण काही सोप नाही त्यामुळे ते काम विभागले गेल्यामुळे प्रत्येकानी आपापली जबाबदारी चांगली पार पाडली. थोडे फार मतभेद झाले तरी शेवट सर्वांनी एकत्र येऊन अधिवेशन यशस्वी केल.

**एव्हढ्या मोठ्या प्रमाणात गोष्टी करायच्या ह्या कल्पनेने कधी धाकधुक वाटली का?**

हे बघ, पूर्वी जरी एक पदार्थ एवढया लोकांसाठी केला नसला तरी एका दिवशी दोन तीन लग्नांना केटरींग केलच होत मी. त्यामुळे मला पूर्ण विश्वास होता की सगळ व्यवस्थित होइल.

**शीला खर सांग. अग चार जणांसाठी खिचडी करण कधीकधी कठीण वाटत मग एवढया जणांसाठी साबुदाण्याची खिचडी चांगली होइल ह्याची तुला खात्री कशी?**

अग, मी आधीच बरेच प्रयोग करुन पाहिले होते त्यामुळे माझी कृती अगदी ठरुन गेली होती. त्या कृतीनी चार जण काय आणि २००० काय हमखास चांगली खिचडी होणारच. अग, तुलाच नाही तर सियाटलचे लोकही म्हणत होते जमेल ना? चिकट तर होणार नाही? करपेल का? त्यांना मग मी चॅलेंज देऊन म्हणाले की खिचडी झाली नाही चांगली तर सियाटलच्या समुद्रात उडी मारीन म्हणुन.

नशिब छान झाली खिचडी, नाही तर पंचाईतच झाली असती. खरच सगळ्यांना खुश केलस पण उपासाला खिचडी खायला घालून.

काही खास अडचणी आल्या का कनव्हेनशन हॉल मध्ये? तिथल स्वयंपाकघर खुप मोठ आणि अद्ययावत आसेल ना?

हो, किचन मधली सामुर्गी आणि यंत्र प्रचंड मोठी आणि अद्ययावत होती पण मला आणि माझ्या सहकार्यांना सवय होती त्याची. अडचण म्हणालीस तर एकच की स्वयंपाकघर पुर्णपणे आमच्या ताब्यात आल शुक्रवारी सकाळी त्यामुळे रात्र रात्र काम करत होतो सगळे. आपल्या स्वयंपाकात आधिपासुन बरीच तयारी करुन ठेवावी लागते ना? दाणे भाजण्यापासून सगळ तिथेच केल आम्ही.

**शीला ह्या अधिवेशनाच्या निमित्ताने इतक्या वर्षांनी निवृत्तीतून परत ह्या व्यवसायात परत आली आहेस मग आता पुढे काय? काय विचार आहे तुझा? आणि रमेशच काय म्हणण आहे त्या बाबत?**

मी आणि रमेशनी ठरवल आहे की, ह्यापुढे कोणी छोट्या-मोठ्या समारंभाना केटरींग कन्सलटंट म्हणून बोलवल तर नक्कीच होय म्हणायच.

**अरे वा! मग आता काय शीलाताई झारे बांधून तयार कुठेही जायला?**

अगदी. जरुर सांग सगळ्यांना शीला तयार आहे झारे बांधून, पदर खोचून.

–मेधागोडबोले

*************************************